# नियमित दिवाणी मुकदमा क्र.१४५/२०२१ मधील
# निशाणी क्र.५० वर आदेश
**CNRNO.MHLA110001552021**

०१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांना कैफीयत देण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, या प्रतिवादीना काही महत्वाची कागदपत्रे उपलब्ध होवु न शकल्यामुळे तसेच कोवीड–१९ च्या प्रादुर्भावामुळे त्यांनी मुदतीमध्ये कैफियत दाखल केलेली नाही. या प्रतिवादी विरुध्द विना कैफियतीचा आदेश पारित झालेला नाही, त्यामुळे झालेला विलंब माफ करण्यासाठी प्रस्तूतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. सदर अर्जास वादीने म्हणणे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे.

०३. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन स्पष्ट होते की, प्रतिवादी विरुध्द विना कैफियतीचा आदेश पारित झालेला नाही. उभय पक्षकारांतील वाद संपुष्ठात येण्यासाठी प्रतिवादीना एक संधी देणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

नि.क्र.५० वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

(के. एस. सुर्यवंशी)

दि.२६.१०.२०२१ दिवाणी न्यायाधीश व. स्तर निलंगा.